# प्रेसनोट

जा.क्र. पोउआ/वाहतूक/ ३८१० /२०१९ पुणे शहर, दिनांक १८/०४/२०१९

**विषय :- वाहतुक शाखेकडील व पोलीस स्टेशनकडील अधिकारी यांना,रोड सेप्टी व इन्व्हेस्टीगेशन या विषयावर व्याख्यान आयोजीत केले बाबत.**

---

मा.पोलीस आयुक्त, पुणे शहर डॉ.श्री.के.व्यकंटेशम् संकल्पनेतुन दिनांक- १८/०४/२०१९ रोजी, सकाळी १०.०० ते १२.०० वा. चे दरम्यान पोलीस उप आयुक्त, वाहतुक श्री. पंकज देशमुख यांचे अध्यक्षतेखाली पुणे शहर वाहतुक शाखेतील सहा.पोलीस आयुक्त व वाहतुक विभाग प्रभारी अधिकारी तसेच आयुक्तालयातील सर्व पोलीस ठाणेकडील १ अधिकारी यांचेकरीता रोड सेप्टी व इन्व्हेस्टीगेशन या विषयाचे व्याख्यान आयोजीत केले होते. सदरचे व्याख्यान हे श्री. भुषण बोरसे,भा.पो.से. व्याख्याते राष्ट्रीय पोलीस अकादमी,हैद्राबाद यांनी दिले असून त्यामध्ये उपस्थित अधिकारी यांना, अपघाताचा शास्त्रोक्त तपास, अपघातांचे प्रमाण कमी करणे, अपघात कमी होणे करीता देशात वेगवेगळ्या ठिकाणी केलेले प्रयोग या बाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे.

व्याख्यानामुळे पोलीस ठाणेकडील अधिकारी यांना अपघातांचे गुन्ह्यात तपास करण्यास तसेच वाहतुक शाखेकडील अधिकारी यांना वाहतुक नियमन व रस्ते अपघात रोखण्याकरीता उपयुक्त माहिती मिळाली असून त्याप्रमाणे सद्यस्थितीत पुणे शहरात ५० टक्के अपघात कमी करण्याचे उदिष्ट ठेवण्यात आलेले आहे.



